Progressive Education Society's

# MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE (Autonomous)

Ganeshkhind, Pune - 411 016.

# NOTICE

To be put up on | To be removed on

Class

2 7 APR 2023

## अत्यंत महत्वाचे

पुणे शहरात दिवसें-दिवस वाहन अपघाताची संख्या वाढत आहे. त्यामध्ये मोठया प्रमाणात जीवीतहानी होत आहे. पुणे शहरात वाढलेल्या अपघातांचा विचार करता अपघात हे मानवी चुकीमुळे व वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन न झाल्यामुळे झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्याकरिता वाहतूकीचे नियम पाळणे आवश्यक आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्या संदर्भ पत्र क्रमांक ४५३९/खटला/प्रापका/ पुणे/ २०२३ दिनांक २४ एप्रिल २०२३ नुसार सर्व सहकारी प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी – विद्यार्थीनी यांना सूचित करण्यात येते की, **मोटार वाहन कायद्यातील कलम १९४ड अन्वये विनाहेल्मेट मोटारसायकल चालविणे किंवा चालविण्यास संमती देणे अशा दोघांवरही जबाबदारी निश्चित करण्यात आलेली असून त्यांना दंडात्मक कारवाईची तरतूद आहे.**

तरी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थीनी यांना या सूचनेद्वारे कळविण्यात येत आहे की दिनांक १ मे २०२३ पासून दुचाकी चालकांना महाविद्यालयात विनाहेल्मेट प्रवेश देण्यात येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. **या बाबतीत प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्या संदर्भ पत्र क्रमांक ४५३९/खटला/प्रापका/ पुणे/ २०२३ दिनांक २४ एप्रिल २०२३ नुसार विनाहेल्मेट दुचाकीवर येणा-यांची यादी वरील कार्यालयास देण्याचे निर्देश आहेत.**

**यास अनुसरुन आपणास आवाहन करण्यात येत आहे की आपण मोटार वाहन कायदयातील १२९ व १९४ड मधील हेल्मेट वापरासंबंधी तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.**

27/4/23

प्राचार्य